# प्रतिबिंब

**तुम्हीही लिहू शकता...**

आपल्या भागातील समस्या असो वा एखाद्या विषयावरील आपली काही मते... मिळविलेले यश, विधायक व प्रेरणादायी काम कुठे तरी मांडावे, असे प्रत्येकालाच वाटते. हीच बाब लक्षात घेऊन 'सकाळ' तुम्हाला प्रतिबिंब पुरवणीत तुमच्या हक्काची जागा उपलब्ध करून देत आहे.

**हे सर्व आपण आम्हाला ९१४६१९०१९१ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवू शकता.**

## » यंग सीनिअर्स



नरंदे (ता. हातकणंगले) येथील ज्येष्ठांसाठी इंडोकाउंट फौंडेशनच्या माध्यमातून आरोग्य सेवा देताना.

## ज्येष्ठांच्या आरोग्यासाठी कार्यरत इंडोकाउंट फौंडेशन



अनिलकुमार जैन



कमल मित्रा

लवकर उठे, लवकर निजे, तया ज्ञानधनारोग्य लाभे, असे पूर्वीच्या ऋषीमुनींनी आरोग्य कसं ठेवावं हे सांगितलं. आरोग्य चांगले असेल तर आयुष्यसुद्धा सुख-समाधानात जातं. आरोग्य व्यवस्थित ठेवण्यासाठी आपणही प्रयत्न केले पाहिजे. असं म्हणतात की, ज्याचं आरोग्य चांगलं तो मनुष्य अखेरच्या क्षणापर्यंत कार्यरत असतो. अगदी स्वत:साठी अन् कुटुंबीयांसाठी, देशांसाठीही तो उपयुक्त ठरतो. आरोग्य सेवेत अखंडपणे काम करणाऱ्या इंडोकाउंट फौंडेशनचे कार्यसुद्धा असेच एकमेवाद्वितीय आहे.

इंडोकाऊंट इंडस्ट्रिज हा भारतातील अग्रगण्य उद्योगसमूह. परदेशांतही कंपनीने आपली गुणवत्ता सिद्ध केली. अशा या कंपनीशी संलग्न असणारे हे इंडोकाउंट फौंडेशन. फाउंडेशन रजिस्टर असून, अनेक सामाजिक उपक्रमांत अग्रभागी आहे. या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी वैद्यकीय सुविधा देण्याचा निर्णय घेतला. फौंडेशनतर्फे ज्येष्ठांसाठी कार्य सुरू झाले. 'तुम्ही रुग्णाची तपासणी करता, तेव्हा त्या रुग्णाची कथा प्रथम ऐकून घ्या. एकदा का तुम्ही रुग्णाची कथा ऐकली की, मग तुम्ही शरीराचे निदान सुरू करा. निदान करताना रुग्ण अशक्त वाटत असेल तर खरेच तो अशक्त आहे का, याची खात्री घ्या. मन आणि हृदय अशक्त नाही ना हेसुद्धा तपासा. नंतर उपचार सुरू करा. रुग्ण कोणताही असू दे.' हे नियम व्यवस्थित पाळले तर रुग्ण खडखडीत बरा होतो. फौंडेशनचं कार्य नेमके अशापद्धतीने सुरू आहे. जिल्ह्यातील अनेक खेड्यांत फौंडेशनने ज्येष्ठ, मुलांसाठी वैद्यकीय सेवा दिली.

फौंडेशनच्या स्वत:च्या चार मेडिकल व्हॅन्स आहेत. जिल्ह्यातील १०० गावांत दर आठवड्याला व्हॅन्स भेट देतात. व्हॅन्समध्ये एक डॉक्टर, एक फार्मासिस्ट, एक नर्स, ड्रायव्हर कार्यरत आहे. प्रत्येक खेड्यात जाऊन ज्येष्ठ, महिला, लहान मुलांची मोफत तपासणी केली जाते. औषधोपचार केले जातात. औषधे देण्याची व्यवस्था व्हॅनमध्ये आहे.

चार व्हॅनद्वारे रोज ३५० रुग्णांची मोफत तपासणी होते. व्हॅनमध्ये वजन, रक्तदाब, शुगर, रक्ततपासणी सुविधा आहेत. आतापर्यंत अडीच लाख रुग्णांची तपासणी, औषधोपचार केले. खेड्यांत अजूनही सक्षम दवाखान्याचे जाळे नाही. खासगी दवाखाने आहेत; पण रुग्णसेवेचे दर जास्त आहेत. एखादा ज्येष्ठ आजारी पडला तर दवाखान्यापर्यंत आणण्यासाठी रस्त्याचे जाळेही नाही. वेळेत गाडी भेटत नाही. अनेकदा ज्येष्ठ असो की, आणखी कोणी, घरी उपचारापुरते का असेना पैसे असतीलच असे नाही. यासाठी फौंडेशनने ज्येष्ठांसाठी मोठे कार्य सुरू केले. रुग्ण आजारी पडला की, तातडीने त्यांना डॉक्टरांपर्यंत न्यावे लागते. औषधोपचार करावे लागतात. म्हणूनच ही व्हॅन अनेकांना उपयोगी पडली आहे. जिल्ह्यात जिथे ही व्हॅन गेली, तिथे सर्व ग्रामस्थांनी व्हॅनचे स्वागत केले. सकाळी लवकर ही व्हॅन एखाद्या गावी जाते. गावातील ज्येष्ठ असो की, महिला, लहान मुले, प्रत्येकाची तपासणी केली जाते. औषधे दिली जातात. वैद्यक सेवेमुळे अनेक ज्येष्ठांनी फौंडेशनला दुवा दिला आहे.

कोल्हापूर महापालिकेचे तत्कालीन आयुक्त पी. शिवशंकर यांनी व्हॅनचे उद्‌घाटन केले होते. पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार चंद्रदीप नरके, अमल महाडिक, माजी महापौर हसीना फरास आदींनी भेट देऊन फौंडेशनच्या कार्याचा सन्मान केला. फौंडेशनचे अध्यक्ष अनिलकुमार जैन, संचालक कलम मित्रा यांच्या कार्याचा गौरव केला. खरेतर ही फौंडेशनच्या उत्तम कार्याची पोचपावती आहे. ज्येष्ठांसाठी आरोग्य शिबिरे, वृद्धाश्रम, आश्रमशाळा, अंधशाळा, पोलिस, कामगार आदींसाठी आरोग्यसेवेचे कार्य सुरू आहे. ज्येष्ठांचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी सीएसआर प्रमुख पी. एन. देशपांडे, डॉ. शिंदे, डॉ. देवके, डॉ. देसाई, डॉ. रावराणे, अमोल पाटील, विठोबा नाईक ही टीम कार्यरत आहे. व्हॅनचा लाभ घेण्यासाठी ज्येष्ठांनी श्री. देशपांडे यांच्याशी संपर्क साधवा. **(संकलन : अमोल सावंत)**

# बावडा, लाईन बझारमध्ये घरांत पाणी

## दैना

### गटारी तुंबल्या; साहित्य सांभाळताना झाली तारांबळ

**कसबा बावडा, ता. ३० : कसबा बावड्यातील लाईन बझारमध्ये तुंबलेल्या गटारीचे पाणी थेट चार घरांतील किचनपर्यंत पोहोचले. लाईन बझार व रेणुका मंदिरासमोरील गल्लीत पाणीच पाणी झाले. रुक्मिणी गणपती काटकर यांच्यासह शेजारील विजय गावडे यांच्या किचनपर्यंत पाणी पोहोचले. गल्लीतील रस्ते उंच झाल्यामुळे हे पाणी आल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत होते.**



कसबा बावडा : तुंबलेले गटार मोकळे करताना महापालिकेचे कर्मचारी.



लाईन बाजार : येथील विजय गावडे यांच्या घरात आलेले पाणी.

घरातील सर्वच खोल्यांत पाणी गेल्यामुळे प्रापंचिक साहित्य ठेवायचे कोठे, असा प्रश्न नागरिकांसमोर उभा राहिला. पहाटेपासूनच रस्त्यावरून पाणी वाहत होते. सकाळी सहाच्या सुमारासच पाणी घरात घुसल्यामुळे नागरिकांची प्रचंड तारांबळ उडाली. सकाळी उठल्यावर नेमके काय करायचे, हेच नागरिकांना सुचत नव्हते. घरातील सर्वांची अंथरुण गुंडाळण्यापासून ते देव्हारा सुरक्षित ठेवण्यापर्यंत धावपळ उडाली. सकाळी मुलांची शाळेला जायची घाई असतानाच पाणी थेट किचनपर्यंत आल्यामुळे स्वयंपाक करणेही शक्य झाले नाही. रस्त्यावरील गटारी तुंबल्यामुळे पाणी रस्त्यावरून संपूर्ण गल्लीतील घरांमध्ये शिरले. अनेकांना बाहेर येणेही शक्य झाले नाही. काही घरांच्या अंगणात, उंबऱ्यापर्यंत पाणी आल्यामुळे घरातून बाहेर पडणे ही शक्य होत नव्हते.

रेणुका मंदिरासमोरील गल्लीत पाणी साचून राहिल्याचे महापालिका प्रशासनाच्या निदर्शनास आल्यानंतर तेथे तातडीने कर्मचाऱ्यांना पाठवण्यात आले. तुंबलेल्या गटारी रिकाम्या करण्याचे काम त्यांनी सुरू केले. मात्र मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहिल्यामुळे कामगारांचाही नाईलाज झाला होता. येथून पुढेही पाणी साचून राहू नये, यासाठी महापालिका यंत्रणा प्रयत्न करीत होती. याच परिसरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना साचलेल्या पाण्यातूनच मार्ग काढत कॉलेजला जावे लागले.

मुसळधार पावसाने बावडा, लाईन बझार परिसरात दाणादाण उडवून दिली आहे. त्र्यंबोली कॉलनी परिसरातील अनेक घरात गुडघाभर पाणी साचले आहे. या मार्गावरून पाण्याचे लोट वाहत होते. नदीकाठच्या पिकांसह गवतीची शेती पाण्याखाली गेल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

लाईन बझार परिसरातील अपर पोलिस अधीक्षक यांच्या निवासस्थानासमोरील रहिमान शेख यांच्याही घरात पाणी शिरले. या परिसरातील अनेक घरात दोन-तीन फूट पाणी होते, घरातील लोकांनी पाणी बाहेर काढले. पावसाचा जोर दुपारी कमी झाल्यानंतर हे पाणी ओसरले.

पंचगंगेच्या पाणीपातळीत प्रचंड वाढ झाली असून बावडा परिसरातील शेती पाण्याखाली गेली आहे. नदीकाठाला लागून असलेल्या खामकर मळा, खुळे पाटील मळा, रणदिवे मळ्यातील जनावरे सुरक्षित स्थळी हलवण्यात आली आहेत.

नदीकाठालाच अनेक गवताची कुरणे आहेत, या कुरणातील गवत कापून पावसाळ्यात जनावरांना घातले जाते. ही गवताची कुरणेही पाण्याखाली गेल्याने चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे.

शाहू जन्मस्थळाच्या भिंतीपर्यंत पंचगंगेचे पाणी पोहोचले आहे. शेतीकडे जाणाऱ्या अनेक पाणंदी पाण्याखाली गेल्या आहेत. कॉलनीतील रस्त्यावर अलीकडेच खोदाई करण्यात आली होती, अशा रस्त्यावर पावसाने दलदलीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. कॉलनीकडे जाणाऱ्या काही मार्गावरही पाणी साचले आहे, त्यातून लोकांना चालत घरी जावे लागत आहे. पाण्याचा निचरा होण्यासाठी रस्त्यांच्या दोन्ही बाजूला गटारींचा अभाव असल्याने कॉलनीतील लोक त्रस्त आहेत.

### चाऱ्याची टंचाई भासणार

शहरात असूनही ग्रामीण बाज जपलेल्या या परिसरात शेतीला जोड म्हणून दुभती जनावरे पाळली जातात. या जनावरांसाठी नदीकाठची कुरणे लिलावात घेऊन तेथील गवत जनावरांसाठी आणले जाते. ही कुरणेच पाण्याखाली गेल्याने चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे.

# रामानंदनगरातील ओढ्याला पूर

### ५० घरांत पाणी शिरण्याचा धोका; अनेकांनी रात्र जागून काढली

**सकाळ वृत्तसेवा**



जरगनगर : रामानंद महाराज मंदिरात शिरलेले पुराचे पाणी.

जरगनगर, ता. ३० : सोमवारी रात्रभर पडलेल्या पावसामुळे जरगनगर-रामानंदनगर परिसरातून वाहणाऱ्या ओढ्याला पूर आला. रामानंद महाराज मंदिरात पाणी शिरले. ठिकठिकाणचे खड्डे पावसाच्या पाण्याने भरले असून, ओढ्यालगतच्या पन्नासभर कुटुंबांना घरात पाणी शिरण्याची भीती आहे.

रामानंदनगर पूल ते रायगड कॉलनी पुलादरम्यान वाहणाऱ्या ओढ्यालगत शेकडो कुटुंबे राहतात. दरवर्षी ओढ्याला पूर आला की, घरांमध्ये पाणी शिरते. ओढ्याच्या दोन्ही बाजूंना सिमेंटची भिंत उभारली असली तरी घरांत पाणी शिरतेच, असा इथल्या लोकांचा अनुभव आहे. काल रात्रभर पडलेल्या पावसाने ओढ्यालगत राहणाऱ्या लोकांचे लक्ष पुराकडे होते. पाणी पुलावर आले की, इथल्या घरांमध्ये पाणी शिरते. त्यामुळे लोकांनी ओढ्याचे पाणी किती फुटांवर आले आहे, याचा अंदाज घेण्यासाठी रात्र जागून काढली.

पुलाच्या बांधकामावेळी हनुमान मंदिर ते वसंतराव जाधव पार्क या रस्त्याची उंची वाढविण्यात आली. मल्हार रोड ते खंडोबा मंदिराकडे जाणारा मार्ग आपोआपच सखल भागात झाला. कालच्या पावसाने या मार्गावर पावसाचे तुडुंब पाणी होते. या मार्गावर ठिकठिकाणी खड्डे असल्याने नागरिकांना चालताना कसरत करावी लागत होती.

**खड्ड्यांमुळे अपघात**

मल्हार रोडवर असलेल्या खड्ड्यांमुळे दुचाकीवरून एक महिला पडून जखमी झाली. पाण्याने खड्डे भरले असल्याने त्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे दुचाकीस्वारांनी मल्हार रोडकडून जाण्याऐवजी त्यांनी रामानंदनगर तालीमकडून मुख्य रस्ता धरला.

### महाप्रसाद वाटप

रामानंद महाराज यांच्या १२५ व्या पुण्यतिथीचा आज दिवस. त्या निमित्ताने मंदिरात पूजा केली जाते. तसेच भक्तांना महाप्रसादही दिला जातो. सकाळी मंदिरात तीन ते चार फूट पाणी होते. पुजारी मारुती कोळी यांनी मंदिरात जाऊन रामानंद महाराज यांच्या समाधीची पूजा केली. मल्हार संकुल परिसरात महाप्रसाद केला व तेथेच भक्तांना त्याचे वाटप केले.

# मुक्त सैनिक, जाधववाडीत ४ गल्ल्यांत पाणी

### नाल्यांबाबतचा नियम धाब्यावर बसल्याचा फटका; नगरसेवक शेळकेंच्या घरालगत पाणी

**सकाळ वृत्तसेवा**



मुक्त सैनिक वसाहत : पाण्याचा निचरा न झाल्याने घरात शिरलेले पाणी.

कदमवाडी, ता. ३० : गेली दोन दिवस सुरू असलेल्या धोधो पावसामुळे कदमवाडी, मुक्त सैनिक वसाहत, जाधववाडी या भागातील पाच गल्ल्या सहा रस्ते पाण्याखाली गेले आहेत. या महापालिकेने यापूर्वी खासगी बांधकाम करताना नाले गटर्सचे नियम धाब्यावर बसवून बांधलेल्या इमारती त्याला पूर्णत्वाचा दाखला

**"गेली दोन दिवस पाणी या परिसरात साचले आहे. त्याची माहिती आयुक्तांना दिली आहे. त्यानंतर महापालिकेचे एक पथक येऊन येथे स्वच्छता सुरू केली. पण हा प्रश्न कायम स्वरूपी सुटावा, यासाठी पाठपुरावा करणार आहे."**

**– नगरसेवक राजसिंह शेळके**

जाधववाडी कदमवाडी रस्त्याच्या

आहे, हे पाणी बाहेर काढण्यासाठी ओढ्याचे नळच लहान असल्याने पाणी पुढे जात नाही, अशी स्थिती आहे.

वास्तविक गेल्या तीनचार वर्षांतही समस्या वाढली आहे. तरीही महापालिकेच्या ताराराणी विभागीय कार्यालयाकडून दुर्लक्ष झाले आहे. इमारती बांधताना या परिसरात असलेले नैसर्गिक ओढ्यांचे आकार मोठे करणे तसेच नैसर्गिक घसरतीनुसार

## 'माधवबाग'तर्फे उद्या शिबिर

कळंबा, ता. ३० :माधवबाग मंगळवार पेठ शाखेचा दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवारी (ता. १) मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. शिबिरामध्ये तपासणी अंतर्गत ब्लडप्रेशर, हार्टरेट, एसपीओटू, बीएमआय, ब्लड शुगर रँडम, ईसीजी, वैद्यकीय सल्ला आणि मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शिबिराचा कालावधी सकाळी दहा ते दुपारी तीन वेळेत असेल. सर्वांनी माधवबाग मंगळवारपेठ, मिरजकर तिकटी येथे नाव नोंदणी करावी.

## कराओके गायन स्पर्धा तयारी अंतिम टप्प्यात

## » माझी परसबाग

# सुरेखा पाटील यांची कलात्मक बाग

घरासमोर सुंदर अशी बाग असावी, असे प्रत्येकालाच वाटते; मात्र अशी सुंदर बाग फुलविण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध नसतो; मात्र मनात आणले तर घरासमोरच्या जागेत झाडे लावून त्यामध्ये कल्पकतेने सौंदर्यही आणता येते. याचीच झलक आपल्याला फुलेवाडीतील सुरेखा पाटील यांच्या बागेत दिसते. सुरेखा पाटील या शिक्षिका असल्यामुळे रोज बागेच्या देखभालीकडे त्यांना लक्ष देणे शक्य होत नाही, तरीही त्यांनी वेळेचा सदुपयोग करत नियोजनपूर्वक झाडांची योग्य मांडणी करून घरालाही एक प्रकारचे सौंदर्य प्राप्त करून दिले आहे. घराच्या मोकळ्या अंगणात हिरवागार फायकस लावला आहे. त्यामुळे नैसर्गिक भिंतच त्यामुळे साकारली असल्याचा भास होतो. अंगणात कमळाच्या आकारातील कुंड्यांमध्ये तीन विविधरंगी कमळे फुलली आहेत. जांभळा, गुलाबी व पांढऱ्या रंगाची कमळे यामध्ये उमलतात. त्यापैकी पांढऱ्या रंगाचे कमळ वर्षभर बहरलेले असते. या कमळाच्या कुंडीलगतच हेमीग्राफीक्स हे शोभेचे झाड कमळाला अधिकच शोभा प्राप्त करून देते. अंगणात तयार केलेले छोटेसे लॉन, त्याच्या चोहोबाजूंनी फुललेली विविधरंगी झाडे आणि ड्रेसेना कोलोरामा या शोभेच्या झाडांमुळे एखाद्या रेस्टॉरंटमध्ये असल्याचाच 'फिल' येतो. या अंगणातील बागेला अधिक आकर्षक कसे बनवता येईल, याकडे त्या लक्ष देतात. त्यातूनच विविधरंगी फुलांची झाडे, शोभेची झाडे यांची दरवर्षी बागेत भर पडते. कोलियसचेही अनेक प्रकार त्यांच्या बागेत पाहायला मिळतात.



फुलेवाडी : सुरेखा पाटील यांनी कल्पकतेने फुलविलेली बाग.

घराच्या पाठीमागील बाजूस मोठी झाडे लावली आहेत. ज्यामध्ये हापूस आंबा, लिंबू, कडीपत्ता यांचा समावेश आहे. स्वयंपाकघरात नेहमी लागणारा कढीपत्ता, गवती चहा, आंबेहळद यांचेही उत्पादन त्यांच्या या बागेत होते. पाठीमागील बाजूस लावलेल्या सोनचाफ्याला सुगंध इतका आहे, की येणारा-जाणारा कोणी असो, या सुंगधाने काही काळ सुखावून जातो. रोज देवपूजेला लागणारी फुले त्यांच्या या बागेतून मिळतात. विविधरंगी गुलाबांचे कलेक्शनच त्यांच्या या बागेत पाहायला मिळते. रोपांना लगडलेले टपोरी गुलाब पाहून एखाद्या नर्सरीमध्येच ही गुलाबाची रोपे बहरली आहेत का, असा प्रश्न बागेला भेट देणाऱ्याला पडतो. घराच्या बाल्कनीमध्ये त्यांनी एक प्रकारचे फ्लॉवर गार्डन साकारले आहे. त्यामध्ये अलमेंडा ही पिवळ्या रंगाची वनस्पती बहरली आहे. त्यांची मुलगी ऋतुजाने

आहे. कावळा नाक्याकडून वाहत येणाऱ्या पावसाचे व गटरीच्या पाण्याने चार गल्ल्यांना तळ्याचे स्वरूप आले आहे.

गेल्या दहावीस वर्षांत मुक्त सैनिक वसाहत, जाधववाडीच्या शेतजमिनीवर भूखंड पाडून या भागात वस्त्या झाल्या. येथे पंचगंगा नदीच्या पुराचे पाणी येत होते. तेथे मोठ्या प्रमाणात भराव टाकला गेला. अपार्टमेंट, खासगी बंगले बांधण्यात आले. इमारतीचे सांडपाणी जाण्यासाठी गटर्स करावी लागतात. त्याची लांबी रुंदी विशिष्ट आकारात असावी, असा नियम आहे. मात्र बहुतेक ठिकाणी आकार लहान आहे. त्यातून बाहेर पडणारे पाणी रस्त्यावर येत आहे. यात कावळानाक्याकडून सदर बाजार किंवा लिशा हॉटेलकडून येणारे पाणी घाटगे कॉलनी, पाटोळेवाडीच्या मागील बाजूने मुक्त सैनिक वसाहत, जाधववाडी येथील ओढ्यात येते. हे पाणी पुढे जाणारा मार्ग भरावा घालून अडवल आहे, अशात या भागातील एक ओढा त्यालाही लहान नळ घातल्याने पाणी पुढे न जाता ते तुंबून रहाते. शिवाय पंचगंगेच्या पुराचे पाणी होत नाही.

तीनचार दिवसांत अशा तुंबलेल्या पाण्याची फूग नगरसेवक राजसिंह शेळके यांच्या घरात गेली आहे. त्यांच्यासह शेजारील घरांमध्ये पाणी शिरले आहे.

याचबरोबर घाटगे कॉलनी, इंद्रजित कॉलनी, पाटोळेवाडी, जाधववाडीच्या मागील बाजूला पाण्याचे तळे साचले नाही. छोटे ओढे भरावात बुजले गेल्याने खासगी कंत्राटदारांनी तेथे भराव टाकल्याने पावसाळ्यात हमखास पाणी तुंबून रहाते त्या पाण्यात डासांची उत्पत्ती होते. डासांमुळे संसर्ग आजारांची लागण होते, परिणामी या परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

आर्ट अँड कल्चर फाऊंडेशन, नलवडे रेकॉर्डिंग स्टुडिओतर्फे मोहम्मद रफी आणि सोनू निगम यांनी गायलेल्या गाण्यांवर आधारित कराओके गीत गायन स्पर्धा होत आहे. ही स्पर्धा उद्या (ता. ३१) सकाळी दहा वाजता सुरू होईल. नलवडे रेकॉर्डिंग स्टुडिओ, लाकडाची वखारजवळ, राजारामपुरी १२ वी गल्ली येथील शाहूनगर जागृती सोसायटीच्या हॉलमध्ये स्पर्धा होतील.

विशेष काळजी घेत.

(संकलन : नंदिनी नरेवाडी)



**बागेत फक्त काही झाडे लावून बागेचा छंद पूर्ण करायचा असे मला पटत नाही. ती बाग सौंदर्यपूर्णच असली पाहिजे. बागेसाठी आम्ही सेंद्रिय खताचाच वापर करतो.**

**- सुरेखा पाटील**